
# मानवाधिकार आणि जागतिकीकरण

डॉ. ज्योती राणे
प्रा. ललित मोमाया । डॉ. विजय तुंटे



Scanned by TapScanner

■ मानवी हक्क : आणि महीलांची स्थिती व भारतीय संविधानाने केलेले कायदे ............... १२९
- प्रा. डॉ. उमेश आर. धुमाळे, आकोट

■ मानव अधिकार : भारतीय संविधानिक तरतुदीचा अभ्यास ............... १३३
- प्रा. माधव शंकर वाघमारे, नंदुरबार.

■ मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना ............... १३६
- प्रा.डॉ. दिलीप तुकाराम कदम, अमळनेर

■ मानवी अधिकारांची विकासात्मक वाटचाल व भारतीय संविधानातील मानवी अधिकार विषयक तरतुदी ............... १३९
- श्री.छोटु नकुल मावची, जळगाव
- श्री.शरद तुकाराम पाटील, जळगाव

■ भारतीय लोकशाहीत आरोग्य हक्काची घटनात्मक तरतुद ............... १४५
- श्री. उपेंद्र धगधगे

■ मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना ............... १४८
- प्रा. सुनिल रामकृष्ण वाघमारे, अमळनेर
- प्रा. आर.सी. सरवदे, अमळनेर

■ मानवी हक्क आणि भारत ............... १५०
- डॉ. संतोष शिवकुमार खत्री, धुळे

■ मानवी हक्काची संकल्पना ............... १५३
- प्रा. श्वेता विनोद वैद्य, अमळनेर

■ मानवी हक्क संकल्पना ............... १५६
- प्रा.डॉ.संजय सांभाळकर, औरंगाबाद.

■ मानव अधिकार आणि सामाजिक न्याय ............... १५८
- प्रा.डॉ.रमेश शेवाळे, मुक्ताईनगर

■ मानवी हक्कांच्या न्याय्य अंमलबजावणीकरीता विविध संघर्षांचा अभ्यास ............... १६३
- सुनिल रोलजी खर्डे, जळगाव

■ मानवी हक्क आणि मानवी विकास ............... १६८
- प्रा.धनराज आर ढगे, अमळनेर

■ मानवाधिकार आणि महिला ............... १७३
- प्रा. ए. बी. महाजन, नवापूर, जि.नंदुरबार

■ महिला आणि मानवाधिकार ............... १७८
- प्रा. डॉ. आर.जी.सुरळकर, मेहकर




Scanned by TapScanner

# महिला आणि मानवाधिकार

प्रा. डॉ. आर.जी.मुरळकर

सहा. प्राध्यापक, तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर

**प्रस्तावना :**

आज विश्वातील माणसा माणसामध्ये, वंश, धर्म, जात, लिग, भाषा, स्त्री, पुरुष अशा भिन्न प्रवृत्ती पाहावयास मिळतात. मुलत: स्त्री, पुरुष समान आहेत. निसर्गाचे घटके आहेत. समाजाचे ते महत्वपूर्ण भाग असून समाज चालविण्यासाठी दोघांचीही आवश्यकता असते, त्यांचा वाटा समांतर आहे, पण सहभाग सुध्दा तेवढाच महत्वाचा आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात उच्च दर्जाचे स्वातंत्र्य, जीवन जगण्याची व सामाजिके उन्नती साधण्यासाठी स्त्री, पुरुषांना समान हक्के आहेत. हाच धागा पकडत संयुक्त राष्ट्र संघटनेने (युनो) ने मानवी हक्के सनदेत १० डिसेंबर, १९४८ रोजी सर्वांना समान अधिकार दिलेले आहे.

प्रत्येकाला निसर्गाने जो जगण्याचा अधिकार दिलेला आहे, त्या हक्कांचे संरक्षण करणे ही जागतिके स्तराची जबाबदारी बनलेली आहे. भारतीय समाजात अस्पृश्य व महिलांना हिन, दीन समजून त्यांच्यावर सतत अन्याय आत्याचार पिढयान - पिढया चालत आलेला आहे. रोज रोज मरण्यापेक्षा एकदाचे मरण पत्करलेले बरे अशी अवस्था होती. महिलावर बलात्कार, विनयभंग, हुंडा बळी, पत्नीताडन, अपहरण, छेडछाड इ. प्रकारच्या अन्याय अत्याचाराची बळी स्त्री ठरलेली होती.

प्रा. लास्की यांच्या मते, ज्या वातावरणात राहुन प्रत्येकाला आपल्या व्यक्तीत्वाचा सर्वांगिन विकास करता येईल ते निर्माण करणे आणि टिकविणे म्हणजे स्वातंत्र्य होय.

स्वामी विवेकानंद भारतीय महिलांसबंधी बोलतांना म्हणाले होते की, जो पर्यत महिलांच्या स्थितीमध्ये सुधारणा होणार नाही तो पर्यत या विश्वाचे कल्याण होऊ शकणार नाही, कोणत्याही पक्षाला एका पंखाने उडणे कदापिही शक्य होणार नाही, हे त्यांचे उद्‌गार अतिशय मार्मिके आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कलमामध्ये स्त्री हक्काविषयीच्या विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे -

१) स्त्रियांना पुरुषा इतकेच अधिकार असूनही कोणत्याही कायद्यान्वये अथवा इतर कोणत्याही पध्श्तीने त्यांना हक्के नाकरणे, त्यांचे अधिकार केमी करणे हे मुलत: अनैसर्गिके व अन्याय असून तो मानवतेच्या प्रतिष्ठेचा अवमान आहे.

२) स्त्रियांविषयी असणाऱ्या सर्व प्रकारच्या गैरसमजूती त्याबददल असणारी अनास्था अथवा हिनपणाची भावना समाजातून काढून टाकण्यासाठी जन मत जागृत करणे.

३) स्त्रिया हया कायद्याच्या दृष्टीकोणातून समान समजल्या जाव्यात पुरूषाइतकेच त्यांना अधिकार व हक्के आणि सर्व प्रकारच्या निवडणूकामध्ये त्यांच्या मतदानाचा हक्के मूलभूत समजल्या जावा.

४) स्त्रियांना सत्ती घेण्याचा, ठेवण्याचा आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याचा, विवाह करण्याचा अथवा न करण्याचा अधिकार आहे.

५) स्त्रियांना सामाजिके व आर्थिके क्षेत्रात वावरतांना समान अधिकार असले पाहिजेत. त्याना आवडीचा व्यवसाय अथवा नोकरी करण्याचा अधिकार असावा.

**महिला व मानवी हक्के :**

स्त्री ने स्वातंत्र्याचा सुर्य कधीछा पाहिला नव्हता. पण स्वातंत्र्यानंतर व स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांच्यात सामाजिके, आर्थिके , राजकीय व शैक्षणिके दर्जा सुधारण्यासाठी भारतीय राज्यघटनेने विशेष काळजी घेतलेली आहे. त्याचाच



330

Scanned by TapScanner

भाग म्हणून भारतीय राज्य घटनेतील भाग -३ व ४ मध्ये कलम १३- ३५ व कलम ३६- ५१ मध्ये मुलभूत हक्के व मार्गदर्शके तत्वे मानवी हक्कासाठी महत्वपूर्ण परिपूर्ण ठरतांना दिसतात महिला हक्कांना अनुसरुनच भारतात १९९० साली महिला आयोगाची स्थापना केरण्यात आली. महिला मध्ये सामाजिके, आर्थिके , राजकीय, जागृती निमार्ण करणे तसेच त्यांना सामाजिके न्याय मिळवून देणे हा उद्देश आहे. जगातील सर्वच नार्गारिकांना मानवी हक्के व मुलभूत अधिकार केणताही भेदभाव न करता प्रत्येकाला दिले पाहिजे. या विषयी राष्ट्रा - राष्ट्रात सहकार्य, उत्तेजन मिळणे आवश्यके आहे. महिलांना जे हक्के आहेत ते पुरुषांच्या हक्कापासून वेगळे करता येणार नाहीत. परंतु महिलांचे दुय्यम स्थान आणि त्यांच्या गंभीर समस्यामुळे महिला करिता स्वतंत्र व विशेष हक्के सांगितले आहेत.

भारतीय समाजात महिला विषयी विकृत स्वरुपाची रुढी व परंपरा पिढयान - पिढया चालत आलेली आहे. महिलांना योग्य सम्मान केला जात नाही. ती एके भोगवस्तू असून चूल आणि मूल एवढे सांभाळले पाहिजे. निर्णय प्रक्रियेपासून ती कोसोदूर होती, गौणस्थानी तीला मानले जात. पाशवी शक्तीचा वापर करुन अपमानीत केले जात. त्यामध्ये अनेकदा स्त्रीयांचा बळी देखील गेलेला आहे, जात आहे. बलात्काराचे दिवसेंदिवस प्रमाण वाढत असून १६ - ३० वयांतील स्त्रीवर ओळखीच्याच व्यक्तीकेडून बलात्कार होण्याचे प्रमाण अधिके आहे. अलिकडच्या काळात १० वर्षाच्या आतील दूध पिणाऱ्या मुलीवर बलात्कार करुन तिला जिवे मारले जात आहे. एवढेच नाही तर महिला म्हणून मातेच्या गर्भात तिला मुठमाती दिली जात आहे. हे सोचनिय व निंदनिय प्रकार आहे. स्त्रीयांच्या आर्थिके स्वातंत्र्यामुळे अनेके प्रश्न व विविध समस्या निर्माण झालेली आहे. वास्तविके स्त्रियांचे अर्थार्जन ही काही नवीन आणि आजची बाब नाही. पण अर्थार्जन करणारी केमावती जोवर स्वत: च्या रुढी व वंश परंपरागत सीमा रेषेच्या वा चौकटीच्या आत राहुन कुटूंब व अर्थार्जन अशा दोन्ही जबाबदाऱ्या बिनदिक्कीत पणे सहन करीत होती. तेव्हा समस्या निर्माण झाल्या नाहीत परंतू स्त्रीला जेव्हा जशी - जशी स्वत: च्या अस्तित्वाची जाणीव व्हायला लागली. माणूस म्हणून जगताना कराव्या लागणाऱ्या तडजोडीची जाणीव झाली. विविध क्षेत्रात काम करीत असतांना स्वत:चे अस्तित्व सिध्द केल्यानंतर अधिकार व हक्काची जाणीव व्हायला लागली. जो हक्के समाजाने वषार्नुवर्ष डावलेले होते ते नाकारत आपल्या हक्कासाठी झगडताना स्त्री दिसत असली तरी स्त्रीवर झालेल्या अत्याचाराच्या गुन्हयाची नोंद न करणे, बदनामीला तोंड दयावे लागते, न्यायालयात नको - नको ते खोचके प्रश्न स्त्रीला हतबल करीत असतात. म्हणून स्त्री बऱ्याचदा कायदयाचा आधार घेत नाही.

**भारतीय राज्यघटना व स्त्री :**

भारतीय समाज पुरुषप्रधान आहे. स्त्रिचा दर्जा गौण असुन ती हिन आहे. तिचा सन्मान नाही. महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासह देशातील काही समाज सुधारकांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. परिणाम म्हणून महिला शिक्षण घेऊन उच्च शिक्षित बनल्या व पुरुषाच्या बरोबरीने काम करु लागल्या. भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय प्रदान केले. मुलभूत हक्के व मार्गदर्शके तत्वे दिली. लोकशाही राज्यपध्दती स्विकारली नाही तर ती एके जीवनपध्दती बनलेली आहे. भारतीय राज्यघटनेत कलम १२ मध्ये मुलभूत हक्काची व्याख्या करुन कलम १४ - १८ मध्ये समानतेचा हक्के देताना कलम १४ मध्ये कायदयासमोर स्त्री - पुरुष समान असतील, कलम १५ मध्ये स्त्री - पुरुष असा भेदभाव करता येणार नाही, कलम १६ स्त्री - पुरुषांच्या विकासासाठी समान संधी किंवा शासकीय नोकरीत समान संधी, कलम १६ - २२ मध्ये स्वांतत्र्याचा हक्के , कलम २३ - २४ मध्ये शोषणाविरुध्दचा हक्के , कलम ३२ मध्ये आपल्या मुलभूत हक्कावर कोणी अतिक्रेमण वा गदा आणित असेल तर त्याविरुध्द घटनात्मके दाद मागण्याची तरतूद केलेली आहे. कलम २६ - ५१ मध्ये मार्गदर्शके तत्वाचा समावेश केला. कलम ३९ मध्ये समान न्याय व कायदे विषय मोफत सहाय्य, कलम ४२ मानवविकास कार्य तरतूदी व महिलांसाठी प्रसुती काळातील सुविधा, कलम ४४ समान नागरीके कायदा सांगतो, कलम ४६ दुर्बल घटकांसाठी (महिला) शैक्षणिके व आर्थिके मदत करणे सामाजिके व आर्थिके = यायाच्या प्रस्थापणेसाठी मार्गदर्शके तत्वाची तरतूद केलेली आहे. मुलभूत हक्कामुळे राजकीय न्याय मिळतो. भारतीय राज्य घटना स्त्रियांसाठी सुवर्णमध्य वा सुवर्णपान आहे त्यामध्ये महिला सक्षम होऊन स्वाभीमानांने जगत असल्याचे चित्र पाहावयास मिळते.

330



Scanned by TapScanner

महिलांसाठी काही विशेष व महत्वपूर्ण कायदे सन १८८५ सतीबंदी कायदा, सन १८५० वारसा हक्क अधिनियम, १८९० बालविवाह प्रतिबंध कायदा, १९४८ मजुरी दर अधिनियम, १९५५हिंदू विवाह कायदा, १९७६ समान वेतन कायदा, १९८६ अश्लील व बीभत्स प्रदर्शन बंदी कायदा १९८६ अनैतीक व्यापार कायदा १९६१ साली कायदयाचे महिलांना प्रसुती काळात सवलत दिलेली आहे. १९८८ मध्ये आंध्रप्रदेश सरकारने देवदासी विरुद्ध कायदा कलम ३५४ प्रमाणे स्त्री अप्रतिष्ठा करणे गंभीर गुन्हा ठरविलेला आहे. भारतीय राज्यघटनेत ७३ व्या ७४ वी घटना दुरुस्ती करुन पंचायत राज्यव्यवस्थेत सुरुवातीला ३३ टक्के आरक्षण होते ते आज ५० टक्के झालेले आहे. पंचायत राज मध्ये या आरक्षणामुळे महिला राज्य आले ते संसद आणि विधान परिषदेत त्यांना आरक्षण देण्याची गरज आहे. त्यामूळे महिला अधिक सक्षम बनतील. त्याच्यावर होणार अन्याय अत्याचार कमी होतील न्यायमुर्ती वर्मानी केलेल्या शिफारशी महत्वपुर्ण असुन त्यांचा स्वीकार करणे आवश्यके आहे.

२००१ हे वर्ष सरकारने महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित केले. ८ मार्च हा दिवस महिला दिन म्हणून साजरा होऊ लागला. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेत १४ ते १८ मध्ये समतेच्या हक्काची हमी दिली असली तरी अनेके क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या मागे आहेत. आज हजार पुरुषा मागे नऊशे सत्तावीस इतके स्त्रियांचे प्रमाण आहे. भारत सरकारने विवाह प्रमाणेच घटस्फोटाचा अधिकार स्त्रियांना दिला आहे. बालविधवा व घटस्फोटित स्त्रियांना कायदयानुसार पुनर्विवाह करण्याचा अधिकार दिला आहे. सतीप्रथेचा कलंके मिटविण्याची तरतूद संविधानांत कायदयाव्दारे करण्यात आली आहे. संपत्तीच्या अधिकारांतर्गत विवाहित मुलीच्या अधिकार संबंधी विशेष तरतूद केली आहे. आई, वडिलांच्या संपत्तीवर मुलीचा, मुलाच्या बरोबरीने हिस्साचा अधिकार मान्य केला आहे. राजकीय अधिकरासंबधी महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रश्न सुरु आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात महिला सक्रीय रित्या कार्यरत आहेत. ७३ ७४ व ८१ व्या संविधान विशोधनानुसार महिलांना एके आव्हानात्मके भूमिका पार पाडण्याची संधी प्राप्त झाली आहे त्या संधीचं सोनं करण्याची जबाबदारी जर स्त्रियांनी योग्य रितीने बजावली तर राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान फार मोठे ठरेल त्यासाठी महिलांचे हक्के व कायदे यांचे काटेकोर पालन होणे सुध्दा तितकेच आवश्यके आहे.

**निष्कर्ष :**

१) भारतीय शासन यंत्रना महिला करीता सक्षम कायदयाची निर्मीती करणे.

२) भारतीय राज्यघटनेने महिलांना दिलेल्या अधिकराचा अभ्यास करता येतो.

३) महिला आयोग व महिलांच्या परीस्थितीचा आढावा घेता येतो.

४) महिलांच्या सामाजिके आर्थिके व राजकीय सहभागांचा अभ्यास.

५) मानवी हक्के व भारतीय राज्यघटनेतील महिलाविषयके तरतुदी लक्षात घेता येतात.

**उपाययोजना :**

१) स्त्रि – पुरुष यांना समान अधिकार कायदयाने दिलेले आहेत मात्र जोपर्यत प्रत्यक्ष व्यवहारात त्याची योग्य प्रकारे अमंलबजावणी होत नाही. तो पर्यंत मानव अधिकार स्त्रिया उपभोगू शकणार नाहीत.

२) महिलांना जागृत केले पाहिजे त्यांना महिला कायदयाची ओळख करुन दयाला हवी.

३) महिलांना साक्षर केले पाहिजे त्यातुन त्याचें राहणीमान व जीवनमान उंचावता येईल.

४) स्त्रियांचे प्रबोधन केले पाहीजे समस्यावर प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात योग्य मार्गदर्शन केले पाहीजे. तशी व्यवस्था केली पाहिजे.

५) महिलांना समाजात मानाचे व प्रतिष्ठेचे स्थान दिले पाहिजे. त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मके केला पाहिजे.

६) महिलांना पोलीस यंत्रणा व न्याय यंत्रणेच्या माध्यमातुन अधिकाधिके सरक्षंण पुरविले पाहिजे.

७) शासनाने स्त्रियांनच्या शोषणाविरध्द अत्याचाराविरुध्द फक्त कायदे न करता कठोर अमंलबाजवणी केली पाहिजे.



Scanned by TapScanner

८) पुरुषांच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने उभे राहता यावे अशी परिस्थिती निर्माण करावी.

९) आधुनिक शिक्षण दिले पाहिजे. माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण दिले पाहिजे.

१०) खऱ्या अर्थाने स्त्रीसक्षमीकरण व स्त्रीसबलीकरण करावे.

११) महिलांना राजकारणात आरक्षण देऊन. जोपर्यंत महिला स्वत: धोरण ठरवत नाही, निर्णय घेत नाही, तो पर्यंत त्यांना पुरुषांच्या धोरणांवर व निर्णयावर अवलंबून न राहताते स्वत: धोरण निर्मात्या झाल्या पाहीजे.

**संदर्भ ग्रथ :**


१) डॉ. पाटील लिला मेहता,भारतीय स्त्री जीवन, पब्लीशिंग हाऊस, नागपुर.

२) डॉ. भोळेभास्कर लक्ष्मण,भारतीय शासन व राजकारण, पिंपळापूरे अॅन्ड के पब्लिकेशन, नागपूर.

३) डॉ बोधनकर सुधाकर, प्रा. घाटोळे रा. मा. सामाजिक संशोधन पध्दती.

४) डॉ. देसाई सुभाष, डॉ. पांडे दया, ओळख मानव अधिकारांची, वेदमुद्रा, प्रकाशन, अमरावती.

५) डॉ जोशी रविंद्र : आर्थिक विकास व नियोजन.

६) श्री. रोहोनी, ह.मानवी हक्क प्रा. गि. कॉलेज नाशिक.

७) श्री. भगवान रजनीश, मूलभूत मानवीय अधिकार.


330

Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana




Scanned by TapScanner